# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रसिद्ध पत्रक

## ➢ "संडे गार्डन" च्या निमित्ताने मिरा -भाईंदर मध्ये सांस्कृतिक आनंद व मनोरंजनाचे तिसरे पर्व संपन्न

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से) यांच्या मार्गदर्शनाखाली "संडे गार्डन" या अनोख्या कार्यक्रमाचे तिसरे पर्व दिनांक १८ मे २०२५ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता (आरक्षण क्रमांक २४२) रामदेव पार्क मिरा रोड (पूर्व), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, आरक्षण क्रमांक २६९, कनाकिया, मिरारोड (पूर्व), जेसल पार्क भाईंदर (पूर्व), सालासर हनुमान उद्यान, उड्डाणपुलाजवळ भाईंदर (पश्चिम), आणि आरक्षण क्रमांक २४२,रामदेव पार्क मिरारोड (पूर्व), या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडले.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक कलाकार व नागरिकांच्या कला गुणांना वाव देण्याच्या दृष्टीने तसेच उद्यानात येणाऱ्या नागरिकांचे मनोरंजन करण्याच्या दृष्टीने स्थानिक कलाकार व नागरिकांकडून त्यांची कला ( उदा. गायन, नृत्य,विनोदी चुटकुले,जादूचे प्रयोग, मिमिक्री करणे इत्यादी) सादर करण्यासाठी हा खुला मंच उपलब्ध करून देण्यासाठी संडे गार्डन हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

या उपक्रमाच्या तिसऱ्या सत्रात (आरक्षण क्रमांक २४२) रामदेव पार्क मिरा रोड (पूर्व) येथे नागरीक व कलाकारांनी नृत्य, गायन, मिमिक्री अशा विविध कला सादर करत संध्याकाळ मनोरंजनात्मक केली. पण खरी रंगत आणली ती १४ वर्षीय जादुगार स्वरांग रणदिवे याने. आपल्या जादुई खेळाने सगळयांना मंत्रमुग्ध करून टाकणाऱ्या या जादूगाराने नागरिकांचे मनोरंजन तर केलेच त्याचबरोबर उत्तम करमणूक देखील केली. तर जेसल पार्क उद्यानात संडे गार्डन निमित्त सुप्रसिद्ध गिटार आर्टिस्ट आहान माथुर यांनी त्यांची कला सादर करून नागरिकांची दाद मिळवली. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, आरक्षण क्रमांक २६९, कनाकिया, मिरारोड (पूर्व), सालासर हनुमान उद्यान, उड्डाणपुलाजवळ भाईंदर (पश्चिम) या ठिकाणी कलाकरांनी आणि नागरीकांनी विविध कला सादर करुन लोकांचे मनोरंजन केले.

संडे गार्डन हा उपक्रम मे महिन्यातील दर रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. येणाऱ्या रविवारी म्हणजेच २५ तारखेला संडे गार्डनचे शेवटचे सत्र ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, आरक्षण क्रमांक २६९, कनाकिया, मिरारोड (पूर्व), जेसल पार्क भाईंदर (पूर्व), सालासर हनुमान उद्यान, उड्डाणपुलाजवळ भाईंदर (पश्चिम), आणि आरक्षण क्रमांक २४२. रामदेव पार्क मिरारोड (पूर्व), येथे संपन्न होणार आहे. तरी मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी तसेच कलाकारांनी या सत्रात उस्फूर्तपणे सहभाग घेत हे शेवटचे सत्र पण आधीच्या सत्राप्रमाणे यशस्वी करावी असे आवाहन मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

या संडे गार्डन अभिनव उपक्रमाच्या वेळी उपायुक्त प्रसाद शिंगटे,कार्यकारी अभियंता शरद नानेगावकर,माहिती व जनसंपर्क अधिकारी राज घरत, विधी अधिकारी सई वडके, सहा.आयुक्त प्रियंका भोसले, उद्यान अधीक्षक नागेश वीरकर व इतर मनपा अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.